# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१०५०
०२०—२५६२१०४८

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:— अंगुसिक/अभाउशिसका/ 366 दिनांक — 01/12/2021

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय — **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०—२१ची माहिती भरणेबाबत.**

संदर्भ — १. मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१—२२/१३७८९, दि. २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी **सन २०२०—२१** या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत महाविद्यालय व परिसंस्थांकडून A.I.S.H.E. पोर्टलव्दारे माहिती **०१ डिसेंबर, २०२१** पासून मागविण्यात येत आहे.

**सन २०२०—२१ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्निकरण मिळालेले आहे. अशा सर्व महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबंधित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही तर भविष्यात होणा—या नुकसानीस संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया सर्वांनी गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी. सन २०२०—२१ पूर्वी ज्या महाविद्यालये व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर अद्यापही नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालये व परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर अद्यापपर्यंत नोंदणी का केली नाही याचा खुलासा मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावा आणि त्याची प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडे सादर करून तातडीने सदर वेबपोर्टलवर नोंदणी करावी.**

तसेच सन २०२०–२१ मध्ये ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत संबंधित वेबपोर्टलवर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचे नांव समाविष्ट करण्यासाठी नोडल अधिका–याचे नांव, मोबाईल नंबर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचे नोंदणी केलेले ई–मेल आयडी, शासन निर्णय व संलग्निकरणाचे पत्र (Affiliation Letter) इ. माहिती पोर्टलवर अपलोड करून नोंदणी करावी. तसेच पुढील मान्यतेकरिता (Registration Approval) संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांच्या नोडल अधिका–यांनी मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १ यांच्या कार्यालयाकडे वरील कागदपत्रांसह व्यक्तिशः उपस्थित राहून मान्यता घेणे गरजेचे आहे.

संबंधित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०–२१ मधील DCF–II ची माहिती पूर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालये व परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतीत ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, याची महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/मा. संचालक व मा. नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावी. त्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे –

www.unipune.ac.in → BOD Online → Login → For College Users → College Login ID → Password → NoC Details → Fill A.I.S.H.E. Info.→ . Select Academic year(2020-21)→r Select Nodal Officer/Principal's Name → Write AISHE Code → Submit → Print NoC Format on College Letterhead 1. Upload NoC Format with Principal/Director's Sign& stamp. 2. Upload A.I.S.H.E. Certificate → Submit.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **दि. २५ डिसेंबर, २०२१** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, दूरध्वनी क्र. ०२०–२५६२१०४८/५० यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

(श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

प्रत माहितीसाठी –

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सहायक कुलसचिव, मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.